# भंडारा जिल्ह्यातील सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती

डॉ. आशा तुकारामजी बानकर, सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र, स्व. गोविंदराव वंजारी शिक्षण महाविद्यालय, बुटीबोरी, नागपूर.

........................................................................................................................

## ★ प्रास्तविक

पुर्वीचा मानव आणि आताचा मानव यात फार मोठी तफावत आहे. पुर्वी मानव रानटी अवस्थेत राहत होता. हळुहळु त्याने स्वतःची प्रगती केली. आता मात्र मानवाने आकाशापर्यंत झेप घेतलेली आहे. हे सर्व मानवाने विज्ञानाच्या साहाय्याने केलेले आहे. मानव जेव्हा विकास करू लागला, तेव्हा मात्र त्याने सर्वात प्रथम शेती व्यवसायाचा शोध लावला. त्यानंतर त्याला सहायक असे लघु उद्योग, कुटीर उद्योग सुरू केले. हळुहळु नंतर त्याने विविध वस्तुंचे व्यवसाय स्थापन केले. ज्या वस्तुंची मानवाला गरज भासू लागली, त्या–त्या वस्तुंचे उत्पादन मानवाने करण्यासाठी विविध व्यवसाय स्थापन करू लागले.

अशाप्रकारे मानवाच्या गरजा हया वाढतच गेल्या आणि मानवाची एक गरज पुर्ण झाली की लगेच दुसरी गरज निर्माण होते आणि तो नेहमीच आपल्या सर्व गरजा पुर्ण करण्यासाठी सतत धडपडतच असतो. अशाप्रकारे व्यवसाय क्षेत्रात व्यवसायांचा शोध लागला व तो आता मात्र फार मोठया प्रमाणात वाढला, औद्योगिकरण मोठया प्रमाणात झाले. मानवाला रोजगार मिळू लागले, त्याचप्रमाणे वस्तुंचे उत्पादन झाल्यामुळे मानवाच्या गरजा सुध्दा पुर्ण होवू लागल्या. मानवाला रोजगार मिळाल्यामुळे मानवाच्या राहणीमानाच्या दर्जा वाढला आणि तो आपला जीवनस्तर उंचावु लागला.

कंपनी किंवा कारखाण्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे जीवन कशाप्रकारचे असते ? त्यांच्या समस्या कोणत्या ? तसेच त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती कशी आहे ? या सर्व गोष्टींचा अभ्यास करून त्यावर योग्य ती उपाययाजना करता येते.

कंपनीतील लोकांचे जीवन कशाप्रकारचे असते, त्यांच्या कामाच्या ठिकाणी वातावरण कसे असते, तसेच कोणत्या सोई–सुविधा त्यांना कंपनी अधिनियमानुसार दिल्या जातात ? या सर्व गोष्टींवर त्यांचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थितीची माहीती करून घेणे आवश्यक आहे.

## ★ संशोधनाची आवश्यकता व महत्व :–

प्रत्येक मानव जीवन जगत असताना तो आपल्या गरजा पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यासाठी त्याला पैशाची आवश्यकता पडत आते. पैसा मिळवण्यासाठी ता सतत प्रयत्नशिल राहून कामाच्या शोधात असतो व त्याला जर काम मिळाले तर तो ते काम (नोकरी) टिकवुन ठेवण्याचा प्रयत्न सतत करीत असतो. मिळालेल्या उत्पन्नात तो आपल्या व कुंटुंबाच्या गरजा पुर्ण करतो. प्रत्येक व्यक्तीने अशाप्रकारे आपली प्रगती केली तर अर्थातच समाजाची, गावाची, देशाची प्रगती होईल. देशाच्या प्रगतीचा जर विचार केला तर प्रत्येक व्यक्तीने स्वतःची पुर्णपणे प्रगती करावी. त्यातच देशाची प्रगती सुध्दा समाविष्ट असते.

देशाच्या प्रगतीत प्रत्येक मानव हा किती महत्वपुर्ण आहे हे यावरून आपल्याला दिसुन येते. अशा या मानवाचा अभ्यास करणे फार आवश्यक आहे. तो अभ्यास करत असताना त्याला त्याच्या कामाच्या ठिकाणी काही अडचणी, समस्या येतात काय, त्या कशाप्रकारे सोडवायच्या इ. गोष्टी बघायच्या आहे. म्हणून सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांची आर्थिक आणि सामाजिक प्रगती, विकास व्हावा, त्यांची स्थिती सुधारावी, त्यांच्या अडीअडचणी दुर व्हाव्यात ही महत्वाची बाब आहे. म्हणूनच या सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या संपर्कात जावून मगच त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करता येईल व त्यांच्या समस्या जाणुन घेता येईल. म्हणून प्रस्तुत संशोधनाच्या समस्येवर संशोधन करण्याची आवश्यकता वाटते.

सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांना कंपनी अधिनियमांनी त्यांची कार्यपध्दती योजलेली आहे काय? त्यांना कंपनी अधिनियमांनी कंपनीत कामाचे तास ठरवून दिलेले आहेत काय ? त्यांचा

विकास साधल्या जातो की नाही. तेव्हा समाजाचा एक घटक या नात्याने त्यांच्या समस्या जाणुन घेवून त्या सोडविण्यासाठी व त्यांची प्रगती करण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर प्रकाश पडेल व त्यांना योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होईल. तसेच पुढील पावले टाकताना त्यांना सर्वतोपरी मदत होईल व त्यात सुधारणा देखील करता येईल.

★ उद्देश

1. भंडारा जिल्हयातील सनफ्लॅग कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. भंडारा जिल्हयातील सनफ्लॅग कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. भंडारा जिल्हयातील सनफ्लॅग कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.
4. भंडारा जिल्हयातील सनफ्लॅग कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्या शोधणे.
5. सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी उपाय सुचविणे.

★ संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

★ संशोधन साधने

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे.

★ जनसंख्या

भंडारा जिल्हयातील सनफ्लॅग कंपनीत काम करणारे सर्व वरीष्ठ व सर्व कनिष्ठ कर्मचारी संशोधनाची जनसंख्या आहे.

★ न्यादर्श

वरील एकूण जनसंख्येपैकी 500 वरीष्ठ कर्मचारी आणि 2000 कनिष्ठ कर्मचारी अशी एकूण 2500 कर्मचारी संख्या ही प्रस्तुत संशोधनाचा आदर्श आहे.

★ विश्लेषण पध्दती

प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी व संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी प्रश्नावली या संशोधन साधनाचा वापर केलेला आहे. मिळालेल्या माहितीवरून टक्केवारी काढून त्यांची मते नोंदवून घेतली व त्यावरून निष्कर्ष काढलेले आहे.

★ निष्कर्ष

1. सनफ्लॅग कपंनीतील कर्मचाऱ्यांच्या कुंटुंबात एकत्र/संयूक्त कुंटुंब पध्दती असून त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे.
2. सनफ्लॅग कंपनीतील कर्मचारी सामाजिक कार्यात सहभागी होतात.
3. सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांची कौटुंबिक स्थिती चांगली असून त्यात सूधारणा चालूच असते.
4. सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यां कडे दुर्लक्ष करू नये.
5. सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांचा विकास व्हावा यादृष्टीने कंपनीने योग्य त्या सोई–सुविधा पूरवाव्यात.

★ संदर्भ

1 Bhandara District Planing Map Sedies, Department of Science and Teachnologies Govt. of India, Calcutta.
2 कंपनीचे मासिक – 1 Sun shine News 2 Sun Shin.
3 सहस्त्रबुद्धे रमेश, वायू प्रदूषण, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे.
4 सहस्त्रबुद्धे रमेश, समुद्र प्रदूषण, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे.

5 मोहतूरे ह. रा., असा आमचा भंडारा जिल्हा, विदर्भ साहित्य संघ लाखनी, ता. साकोली, जि. भंडारा.
6 नखाते दिनेश, भंडारा जिल्हा गौरव, साप्ता. गंगा भूमी, रजि. नं. 0280/97 टी. सी. श्रीनगर, गोंदीया– 441601
7 भंडारा जिल्ह्याचा सामन्य भूगोल, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
8 जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, भंडारा जिल्हा(2003–2004)
9 जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, भंडारा.
10 मुळे रा. श. आणि उमाठे वि. तु., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर. 1988
11 भितांडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, नूतन प्रकाशन, पुणे. 1989
12 आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर. 2000
13 कुलकर्णी डी. आर., पर्यावरण शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर.
14 देसाई श्री. मु. आणि भालेराव निर्मल, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
15 देशमुख प्रभाकर, श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.1987
16 देशमुख प्रभाकर, श्रमिकांच्या समस्या.
17 पाटील सुमती, श्रमिकांचे प्रश्न.
18 नेगी पी. एम., कामगार एव समाज.
19 कुमार आर., कामगारो की समस्याए.
20 इंटरनेट